# नारू



हे चित्र पाहिलेत ?
सुतळीसारखा आणि हातभर लांब जंतू आहे.
हा आपल्या अंगात शिरला की ताप येतो,
मळमळते, ओकाऱ्या होतात, पायावर
गळू होते. तेथे फार खाज सुटते. आग होते.
गळू फुटते. चिकट पांढरे पाणी बाहेर येते.

याला म्हणतात ‘नारू.’

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई ४०० ००५
प्रकाशक: इंडियन इंस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन
पुणे ४११ ०२९

नारू एकाला झाला तर दुसऱ्याला कसा होतो ?
नारू झालेला माणूस पाण्यात जातो.
पायाच्या गळवातून नारूची मादी डोके बाहेर काढते.
नारूच्या अळ्या, दुधट पाणी बाहेर पडते.



अळ्या राजगिऱ्याच्या दाण्यांसारख्या दिसतात.
त्या पाण्यात पोहतात.
लहान ढेकणासारखा एक किडा या अळ्या
गिळतो. किड्याच्या पोटात अळ्या वाढतात.



(३)

दुसरा माणूस हे पाणी पितो.
किडे त्याच्या पोटात जातात.
पोटात नारूच्या अळ्या मोकळ्या होतात.
मोठ्या होतात.
कातडीपर्यंत येतात.
गळू होते.
गळू फुटते.
माद्या डोके बाहेर काढतात.
नारू आपल्या अळ्या बाहेर टाकतात.





नारू लवकर बरा होत नाही.
एक एक नारू गुंडाळून काढावा लागतो.
माणूस अगदी हैराण होतो.





तळी, विहिरी स्वच्छ ठेवल्या,
त्यात मधून मधून लाल औषध (पोटॅशियम
-परमँगनेट) टाकले,
पिण्याच्या पाण्यात पाय टाकला नाही,
पाणी गाळून घेतले
तर

नारू होणार नाही.